# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०५/०६/२०२६ (शुक्रवार )

---

## अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद, १४ लाख ३५ हजार ९०० रूपयांचा मुद्देमाल जप्त जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक ०५/०६/२०२६ रोजी जलालखेडा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, रोहना गावाजवळील विवरा शिवारातील जाम नदी चे पात्रातुन काही इसम अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून तेथुन चोरी करून ट्रॅक्टर ने वाहतुक करीत आहे अशा मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी अनुक्रमे खालील प्रमाणे २ गुन्हे नोंद केले.

**कारवाई क्रं १)** :— पोलीसांनी विवरा भिष्णुर रोडवर नाकाबंदी केली असता जाम नदीचे पात्रातुन विवरा कडे एक ट्रक्टर ट्रालीसह येतांना दिसला. त्यास थांबनिण्याचा इशारा केला असता सदर ट्रक्टर चालकाने ट्रक्टर थांबवुन पळुन गेला. चालाकाच्या साथीदार **सागर राजेंद्र दहाट, वय १९ वष, रा. रोहना, ता. नरखेड, जि. नागपुर** याला पोलीसांनी शिताफिने पकडले. पळुन गेलेल्या चालकाचे नाव पत्ता विचारले असता चालक नामे **ज्ञानेश्वर गणपतराव खंडाते, वय अंदाजे ३१ वर्ष रा. रोहना ता. नरखेड जि नागपुर** तसेच ट्रक्टर मालकाचे नाव **राजेंद्र मोतीरामजी दहाट ,रा रोहना** असे असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक्टर क्रमांक एम एच ४० बीजे १७५८ आणि १ ब्रास पेक्षा जास्त रेती, घमेले, चाळणी, फावडे असा एकुण किंमती ७,२५,७०० /—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**कारवाई क्रं २) :—** पोलीसांनी रोहना गावाजवळील विवरा शिवारातील जाम नदी चे पात्रात जावुन पाहणी केली असता तेथे काही इसम घमेले फावडयाने विनाक्रंमाकांचे ट्रक्टर मध्ये रेती भरतांना मिळुन आले. त्यांना परवान्याबाबत विचारणा केली असता त्यांच्या कडे कोणताही परवाना नव्हता. ट्रक्टर चालक याला नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव **अरूण संतोष धुर्वे , वय २९ वर्षे, रा. इंदरवाडा, ता. नरखेड जि नागपुर** अशी माहीती प्राप्त झाली. सदर चे ट्रक्टर व ट्रॉली कोणाचे मालकीचे आहे, असे विचारले असता त्याने सदर ट्रक्टर व ट्राली ही **पुरुषोत्तम पुंडलिकराव बांबल, रा. रोहना** यांचे मालकीचे असुन त्यांचा मुलगा **ज्ञानेश्वर उर्फ नितेश पुरुषोत्तम बांबल, रा. रोहना** याने रेती काढण्यासदिली अशी माहीती आरोपी चालकाने पोलीसांना दिली. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष विना क्रमांकाचा ट्रक्टर व ट्रॉली आणि १ ब्रास पेक्षा जास्त रेती, घमेले, चाळणी, फावडे असा एकुण किमती ७,१०,२००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद दोन्ही कारवाई दोन वाहनासह रेती असा एकुण १४,३५,९००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन जलालखेडा येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८(७)(८), खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम १९५७ चे कलम ४/२१, सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३ तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद, पारशिवणी पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक ०५/०६/२०२६ रोजी पहाटे पारशिवणी पोलीस अवैध धंदयांवर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पेंच नदीपात्रातून अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे घटनास्थळी जात असतांना काळाफाटा शिवार येथे ट्रॅक्टर क्र. एम एच ४० सी एच ३२५२ दिसुन आला. ट्रॅक्टर चालक पोलीसांना पाहुन पळुन गेला.

**पोलीसांनी पंचासमक्ष ट्रॅक्टर क्र. एम एच ४० सी एच ३२५२ आणि विना क्रमांकाची ट्रॉली एकुण किमती ३,००,००० /—रूपये, फावडे आणि घमेले असा एकुण ३,००,९०० /—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद वाहन चालक आणि मालक आरोपी विरूध्द पोस्टे पारशिवणी भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७) (८), खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम १९५७ चे कलम ४/२१, सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३ तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे**

# अवैधरित्या विनापरवाना दारू निर्मित, विक्री तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १०गुन्हे नोंद

दिनांक ०४/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू निर्मिती, बाळगुन विक्री तसेच सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल सडवा असा एकुण ६५,७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १० गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) मनोज मदन पवार, वय ४२ वर्ष,रा डोंगरगाव ता.काटोल जि नागपुर आणि २) महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे १) अनिल भैयालाल बारमासे, वय २९ वर्ष, रा मोवाड आणि २) अरून भैयाजी मोरे, वय ५० वर्ष, रा. वडा उमरी, ता. नरखेड यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे हर्षल फुलदास देवलकर, वय २९ वर्ष,रा. तिडंगी ता कळमेश्वर, याचे वर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे मोहनसिंघ मुनालाल चौरिया,वय ३२ वर्ष रा. सातगाव रिधोरा ता हिंगणा, जि नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे आशिरू संजय पाटील, वय ३० वर्षे, रा. टाकळघाट, ता हिंगणा, जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे रोशन रहमान शेख,वय २६ वर्षे, रा. महालगाव, ता. भिवापुर, जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे महाविर मुरलीधर डेकाटे, वय ४३ वर्षे, रा. अरोली, वार्ड क्र १, ता. मौदा,याचे वर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे सुभूम सुनिल ईडपाची,वय २६ वर्ष,रा चोरबाहुली,ता रामटेक याचे वर १ गुन्हा नोंद. अशा १० आरोपींवर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १० गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**नमुद कारवाईत एकुण ४,९५० मिली देशी दारू, २५० लिटर मोहाफुल दारू, २,१२० लिटर सडवा आणि साहीत्य असा एकुण ६५,७००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने